# Akshara Multidisciplinary Research Journal

## Peer-Reviewed & Refereed International Research Journal

October- December2023

Volume 04 Issue IV

Scientific Journal of Impact Factor (SJIF) Impact-5.67

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

International Impact Factor Services

International Society for Research Activity (ISRA)
Journal-Impact-Factor (JIF)

Digital Online Identifier-
Database System
An International Digital and Virtual Library

Akshara Publication
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201



CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 28 | महाविद्यालयीन स्तर पर अध्ययनरत छात्र-छात्राओं की शैक्षिक उपलब्धि पर प्रसन्नता के प्रभाव का अध्ययन | प्रा. सुनीता अरविंद जगताप | 115 |
| 29 | मराठी साहित्याला सशक्त करणारी प्रा. आ. य. पवारांची विज्ञान कविता | प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | 118 |
| 30 | जलसिंचन व त्याची परिणामकारकता | प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर | 123 |
| 31 | कवयित्री रुक्मिणीबाई तुकाराम पाटील व उर्फ वैदर्भी बहिणा | प्रा. डॉ. अनंत वराडे | 126 |
| 32 | आधुनिक मराठी ख्रिस्ती साहित्याचे योगदान | प्रा. दीपक संतोष पवार | 129 |
| 33 | 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'कादंबरीमध्ये ग्रामविश्वाचे चित्रण | प्रा.कोटरंगे दत्ता नामदेव | 132 |
| 34 | विकासाबाबतचा आदिवासींचा दृष्टिकोन आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यासाठीची एकात्मिक कृती योजना | प्रा.डॉ.विशाल दिलीप वाणी | 135 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार | डॉ.संभाजी संतोष पाटील | 140 |
| 36 | अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीतील बदल | शैलेश गायकवाड<br>डॉ. राजश्री मेश्राम | 145 |
| 37 | दलित काव्य एक जीवनदर्शन | प्रा. नवाजी गेंदलाल घरत | 151 |
| 38 | 'ऊसकोंडी' ग्रामीण कादंबरीतील कृषीजीवन | प्रा.डॉ.दिनेश हिंमतराव पाटील | 156 |
| 39 | समाज जीवनात प्रसार माध्यमांची भूमिका | श्री विलास बन्सी दांडगे | 159 |
| 40 | ग्रामगीतेतील ग्रामशुध्दी | प्रा. डॉ. अनंत वराडे | 163 |




CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV
SJIF Impact- 5.67

29

# मराठी साहित्याला सशक्त करणारी प्रा.आ.य.पवारांची विज्ञान कविता

प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभाग प्रमुख
को.ए.सो. लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड.

**प्रास्ताविक:**

विज्ञान साहित्य ही संज्ञा Science Fiction या संज्ञेचा मराठी पर्याय आहे. आणि 'साहित्य' ही संज्ञा सर्जनशील साहित्य या अर्थाने येथे वापरलेली आहे.काव्य,कथा, कादंबरी,नाटक हे सर्जनशील साहित्य होय. यामुळे ज्या साहित्यकृतीचा आशय विज्ञाननिष्ठ आहे ती साहित्यकृती विज्ञान साहित्य ठरते. सर्जनशील साहित्य हे वास्तवाची नवनिर्मिती असते. साहित्यिकाच्या कलात्मक कल्पनेतून ते जन्मास आलेली असते. त्यामुळे सर्जनशील साहित्यकृतीत वास्तव आणि कलावंत हे दोघेही असतात सर्जनशील साहित्यकृती ही सदैव स्वतंत्र स्वयंपूर्ण आणि संपूर्ण कृती असते.

विज्ञान साहित्य केवळ विज्ञानाचा विषय नसून साहित्याचा भाग आहे.विज्ञान साहित्यात विज्ञान हा शब्द येत असला तरी "विज्ञान-साहित्य म्हणजे विज्ञानातील एखादे वास्तव सत्य यातून निर्माण होणारी कलात्मक कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मिती होय. संभवनीयता आणि शक्यता यांच्या मर्यादेत येथे कल्पित वावरत असते. सौंदर्यानंद देणे हेच विज्ञान साहित्याचे अंतिम प्रयोजन ठरते. कुठल्याही साहित्यकृतीचे हेच प्रयोजन असते. विज्ञान शिक्षण देणारे किंवा सुबोध सोपे केलेले मनोरंजन करून सांगितले विज्ञान म्हणजे विज्ञान साहित्य नव्हे तर विज्ञान साहित्य ही साहित्याची एक शाखा आहे.

विज्ञान साहित्य म्हणजे विज्ञान विषयक लेखन नव्हे. विज्ञान साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस असतो. विज्ञान साहित्य विश्वामध्ये माणसाचे काय स्थान आहे याचा शोध घेते. विज्ञान साहित्यात केवळ शोधाचे चित्रण अपेक्षित नसून वैज्ञानिक प्रगतीचा माणसावर व या शोधामुळे समाज जीवनावर काय परिणाम होतो याचे चित्रण अपेक्षित असते म्हणजे विज्ञान साहित्यात शोधाला महत्त्व नसून त्यामुळे होणाऱ्या बदलाला महत्त्व आहे. यंत्रमानव, पर्यावरण, पृथ्वी,अवकाश अशा विविध विषयाच्या अंगाने विज्ञान साहित्य लिहिले. विज्ञान साहित्याचा अनेक विचारवंतांनी विविध अंगांनी विचार केला आहे. जयंत नारळीकरांसारख्या शास्त्रज्ञ असलेल्या विज्ञान लेखकाच्या विज्ञान कथा लेखनामागचा उद्देश मनोरंजन नाही. विज्ञानाची माहिती आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा प्रचार करण्यासाठी विज्ञान व कथा लिहिल्या जाव्यात असे त्यांना वाटते ते म्हणतात, "विज्ञानाची गोळी जर कडू लागत असेल तर त्याला साखरेचे कोटिंग म्हणजे कथेचे रूप देणे योग्य ठरेल. विज्ञानकथा अशा उद्देशाने लिहिल्या जाव्यात असे मला वाटते. निदान मी लिहितो त्या कथा ह्याच उद्देशाने लिहिलेल्या आहेत".

**विज्ञान कथा :**

मराठीत प्रारंभी विज्ञान कथा अधिक प्रमाणात लिहिली गेली. मराठीत वा. म. जोशी यांची 'अदृश्य किरणांचा दृश्य प्रकाश' १९१६ ही पहिली विज्ञान कथा मानली जाते. मात्र त्याअगोदर मराठी साहित्यात प्रथम १८३३ मध्ये हरी केशवजीचे 'सिद्ध पदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद'हे अनुवादित पुस्तक प्रसिद्ध झाले होते. नवल, हंस या मासिकानी विज्ञान कथेला उचलून धरले. त्याकाळात द.चि. सोमण, द. पा. खांबोटे, गजानन क्षीरसागर, यशवंत रांजणकर अशा अनेक लेखकांनी इंग्रजी कल्पनांना भारतीय पेहराव देऊन विज्ञान कथेला मराठी मातीत रुजविले. प्रारंभी रहस्यकथा, अद्भुतरम्यकथा, परीकथा, विज्ञान कथा यांची सरमिसळ होत होती. मात्र जसा विज्ञान कथा लिहिल्या जाऊ लागल्या तसे विज्ञान कथेचे स्वरूप स्पष्ट होऊ लागले.

निरंजन घाटेंनी विसाव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या विज्ञान साहित्याची नवभारतच्या डिसेंबरच्या अंकात यादीच दिली आहे. त्यात वा. म. जोशींची 'अदृश्य किरणांचा दिव्य प्रकाश'(१९१६) श्री. बा. रानडेची मनोरंजन मासिकात प्रसिद्ध झालेली 'तारेचे हास्य'(१९१५),'रेडियम'(१९१६),त्र्य.र.देवगिरीकरांची 'चित्रमय जगत' मध्ये प्रसिद्ध झालेली 'शरद लोकांची सफर' ना. वा.कोगेकरांची 'मृत्यु किरण'(१९३६) असे प्रारंभीचे काळातले विज्ञान साहित्य तुरळक स्वरूपात प्रसिद्ध झाले होते असे नमूद केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या तीस-चाळीस वर्षात मात्र विज्ञान कथा विपुल प्रमाणात लिहिली गेली. विज्ञान कथा लिहिणाऱ्या लेखकात लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, आ. ना. पेडणेकर, रमेश सरदार, बाळ फोंडके, प्रा.रा.वि.सोवनी,चंद्रकांत



CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67

पाटील, भालबा केळकर, शुभदा गोगटे, भैय्या पवार, सुबोध जावडेकर, यशवंत देशपांडे, अरुण मांडे, द. व्य. जाहगीरदार,सौ. रेखा बैजल, डिंगणकर, जयंत नारळीकर, माधुरी शानबाग, वसंत गोवारीकर अशा अनेक विज्ञान कथा लेखकांनी विज्ञान कथा विकसित केली.

**विज्ञान कादंबरी :**

मराठी कादंबरी वाङ्मय प्रकारांमध्ये विज्ञान कादंबरीचा उदय इंग्रजी कादंबरीमधील विज्ञान कादंबरीच्या अनुकरणातून झाला. शास्त्रज्ञ सृष्टीचा अभ्यास करून तर्कसंगतीतून सत्य शोधून काढतात. त्याप्रमाणे ललित लेखकही सत्य शोधण्याचा प्रयत्न करतो. प्रत्यक्ष ज्ञानाधारे शास्त्रज्ञ प्रयोगाने काही बाबी स्पष्ट करतो. लेखकही सृष्टीचे ज्ञान मिळवून अनुभव व भावसंगतीतून आपली कल्पना मांडतो. दोघेही सत्याचे शोधक असतात. विज्ञान सृष्टीला मराठी कादंबरी कवेत घेण्याचा प्रयत्न करते आहे ही काळाची गरज आहे.

मराठी कादंबरीत विज्ञान विषयक कादंबऱ्या नगण्य असल्या तरी जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, अ. ना. पेडणेकर, रमेश सरदार, बाळ फोंडके, प्रा.रा.वि.सोवनी,चंद्रकांत पाटील,प्रा.भालबा केळकर, भैय्या पवार, डॉ. व. दि. कुलकर्णी आदी विज्ञान विषयक लेखन करणाऱ्यांनी विज्ञान कादंबरीला वाट करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

नाथ माधव यांनी १९०८ मध्ये 'श्रीनिवासराव' ही विज्ञानाधिष्ठित पहिली कादंबरी लिहिली. शिवाय वि.वा. शिरवाडकरांची 'कल्पनेच्या तीरावर'आणि ना.के.बेहरे यांची 'ध्येयाकडे' या भविष्यातील आदर्श समाजाचे चित्रण करणाऱ्या विज्ञान कादंबऱ्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात सुरेंद्र बारलिंगे यांची 'मी माझेपण' ही लिंग बदलावरील विज्ञान माहितीची बैठक घेवून स्त्री-पुरुष व्दव्दांतील मानसिक ताण समर्थपणे व्यक्त करणारी कादंबरी आहे. जयंत नारळीकरांनी मराठीमध्ये खगोलशास्त्रावर बरेच लेखन केले आहे. नारळीकरांचे गुरु प्रा. फ्रेड हॉइल यांच्या 'कृष्णमेघ' या कादंबरीच्या प्रेरणेतून त्यांनी विज्ञानकथा शिवाय 'प्रेषित' व 'वामन परत न आला' या व इतर विज्ञान कादंबऱ्या लिहिल्या. जयंत नारळीकरांनी ज्या पद्धतीनं विज्ञान साहित्य मराठीत प्रस्थापित केलं त्याला तोड नाही.

निरंजन घाटे हे विज्ञान कथाकार म्हणून लोकप्रिय आहेत त्यांनीही अनेक विज्ञान कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या 'फिनिक्स,रामचेआगमन, मच्छर,आक्रमण,साक्षात्कार, वारस, इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.गो.बा. सरदेसाई यांची त्रिपुरारी' ही पौराणिक कथांना आधुनिकतेचा संदर्भ देणारी विज्ञानपर कादंबरी आहे. राजेंद्र बर्वे यांची 'स्कायलॅब' अशीच विज्ञान कादंबरी आहे.

लक्ष्मण लोंढे हे ही विज्ञान कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काही विज्ञान कादंबऱ्या आहेत. त्यांची 'देवासी जिवें मारिले' ही लक्षणीय विज्ञान कादंबरी आहे. शुभदा गोगटे यांनी मराठी कादंबऱ्या बरोबर काही विज्ञान कादंबऱ्या लिहिल्या त्यांची यंत्रायणी' ही विज्ञानावर आधारित कादंबरी आहे.या शिवाय डॉ. भा.ल. महाबळांनी 'जंगलगाथा, विहंगगान, इत्यादी विज्ञानविषयक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अरुण साधू यांच्या 'स्फोट'आणि 'विप्लवा' ह्या विज्ञानविषयक कादंबऱ्या आहेत. दि. बा. मोकाशी यांच्या 'जगाच्या कोलांट्या, बालचंद्र, यंत्र आणि तंत्र रवींद्र देसाई यांची 'ग्यानबाचा गोबरगॅस'वसंत शिरवाडकरांची 'माणूस कसा झाला' अनिल गोटेंची 'माकडचेष्टा' नाडकर्णींची 'पृथ्वीवर माणूस उपराच' इत्यादी विज्ञान पर कादंबऱ्या या काळात लिहिल्या गेल्या.

एकंदरीत मराठीतील विज्ञान कादंबरी अद्याप बाल्यावस्थेतच दिसते. तरी मराठी वाचकासमोर विज्ञानाच्या कल्पनेला घेऊन टप्प्याटप्प्यावर काही लक्षणीय कादंबऱ्या काही कादंबरीकारांनी लिहिल्या आहेत. त्यात जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, बाळ फोंडके, अरुण साधू, गजानन क्षीरसागर आदी नावे सांगता येतील.

१९६० नंतरच्या नवसाहित्य प्रवाहाने मराठी साहित्य प्रवाहामध्ये आपले स्थान अधिक बळकट केले आहे. परंतु विज्ञान साहित्यातील कथा,कादंबरी या प्रकारापेक्षा विज्ञान कविता या प्रकाराला मराठी साहित्यात लेखक व समीक्षकांनी उपेक्षित ठेवलेले दिसते.मराठी साहित्यात मात्र फार थोड्या कवींनी विज्ञानकाव्यनिर्मिती केली. गोविंदाग्रजांची 'परमाणुचे कार्य महात्म'ही १९१६ मध्ये 'मासिक मनोरंजन'मध्ये प्रसिद्ध झालेली गोविंदाग्रजांची कविता मराठीतील पहिली विज्ञान कविता असल्याचे निरंजन घाटे यांचे मत आहे. पहिली विज्ञान कविता प्रसिद्ध होऊन शतक उलटले तरी विज्ञान कवितांची संख्या मात्र अल्प आहे.याचे प्रमुख कारण विज्ञानलेखक व समीक्षक यांची विज्ञानाबद्धल असलेली उदासीनता हे आहे.मराठीत गोविंदाग्रज, विंदा करंदीकर, शिरीष देशपांडे,वाशिम बडेकर,कवी कुसुमाग्रज, पु शि रेगे, चंद्रकांत पाटील आधी कवींनी विज्ञान कविता लेखन



CamScanner

करून मराठी विज्ञान कविता समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी मराठी विज्ञान कविता संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने आशयाच्या व शैलीच्या दृष्टीने अद्यापही बाल्यावस्थेत आहे हे येथे नमूद करावेसे वाटते.

या पार्श्वभूमीवर प्रा.आ.य.पवार यांच्या ग्रामीण विज्ञान कवितांनी मराठी कवितेत एक नवा काव्यप्रकार मराठी कवितेला दिला. नव्वदोत्तरी मराठी साहित्यात ग्रामीण जीवनावर कथा-कविता लेखन करणारे प्रा. आय.य.पवार हे प्रतिभासंपन्न कवी आहेत कथेपेक्षा कवितेत त्यांना विशेष रुची आहे.

'विज्ञान साहित्याच्या उपेक्षित अंगाचा इतिहास' या लेखात डॉ. निरंजन घाटे म्हणतात की, "विज्ञान-तंत्रज्ञान प्रगतीचा मानवी भविष्य काळावर होणाऱ्या परिणामाबद्दलचा अंदाज हे विज्ञान साहित्याचे पहिले आणि महत्त्वाचे लक्षण ते जर कवितेत नसेल तर ते विज्ञान कविता होऊ शकत नाही मी आजपर्यंत ज्या कविता वाचल्या त्यात वैज्ञानिक सत्याचा वापर आहे पण भविष्यातील मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा विचार असलेली एकही कविता मला तरी आढळलेली नाही. त्यामुळे मराठी भाषेत माझ्यामते अजून तरी विज्ञान कविता असं ज्या काव्यरचने म्हणता येईल अशी कविता लिहिली गेली नाही"

वरील विधानास प्रा.आ.य.पवार यांच्या विज्ञान वंदना, रूपांतर, अनोखी खरेदी, विज्ञानयुग, पाणीदार चंद्र, ह्या कविता मात्र अपवाद ठरतात. या कवितेत कवीने विज्ञान तंत्रज्ञानाची भविष्यातील मानवी जीवनावर होणारे परिणाम रेखाटलेले आहेत.

विज्ञान वंदना ह्या कवितेत कवीने जनुकीय तंत्रज्ञान रोबोटिक तंत्रज्ञान संगणकीय तंत्रज्ञान क्लोनिंग तंत्रज्ञान अंतराळ विज्ञान सौर ऊर्जा इत्यादी तंत्रज्ञानातील प्रगतीचे वर्तमानकालीन व भविष्यकालीन परिणाम व्यक्त केलेले आहेत.

"जनुकीय तंत्रज्ञाने वार्धक्यावर मात केली  
दोन शतक जगण्याची माणसाला हमी आली  
पन्नाशीचे पोर पण सव्वाशीचे तरूणपण  
ब्रह्मा हाती हृदयगती नुरेल जगी आजारपण  
दीर्घायुष्याचे आता नवे चार टप्पे होतील  
पंखाळली माणसे भरारत नभी जातील"(धूळपेर पृष्ठ क्र. ७८)

आज जनुकीय तंत्रज्ञानाने माणसाच्या जीवनात क्रांती केली आहे. भविष्यात या तंत्रज्ञानाच्या प्रगतीने त्याचे आजारपण नष्ट होतील, तो वार्धक्यावर विजय मिळवेल. त्यामुळे माणसाचे आयुष्य थोडेतिडके नव्हे तर दोनशे वर्षे होईल. सहाजिकच पन्नास वर्षाचे बालपण आणि सव्वाशे वर्षाचे तरुणपण होईल. तुमचं हृदय जे धडधड करते ते ब्रम्हयाच्या हातात आता आजारपण उरणार नाही. माणसांना पंख फुटलतील कदाचित पाखरासारखी उडायला पण लागतील असे मिश्कीलपणे कवी व्यक्त करतो.

जनुकीय तंत्रज्ञाना प्रमाणेच संगणकीय तंत्रज्ञानानेही आपल्याला आज अचंबित केलेले आहे. सर्वव्यापकत्व व माणसाचे त्याच्यावरील अवलंबित्व बघता भविष्यात संगणकाचे जाळे माणसाबरोबर अंतराळातपर्यसुद्धा पोहोचेल हुंडा बिंदा बंद होईल, नवीन नियम, नव्या शर्ती येतील. एक महिना मंगळावर स्वप्न निवास हॉटेलमध्ये बुक करा. सगळा शोध घेण्यासाठी ब्रह्मांडामध्ये यान गेली आहेत. विमाने रेल गाड्या सौरऊर्जेवर धावतील. विधर्मी आकाशामध्ये समुद्र पाणबुड्या शोधायला लागेल अंतराळात जाण्यासाठी यानच होईल शिडी असे कवी आपल्या कल्पनेतील आदर्श समाजाचे चित्र रेखाटतो.

१९९० नंतर विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने झाली आहे विज्ञानाच्या प्रगतीचा परिणाम मानवी समाज व संस्कृतीवर होत आहे. या वैज्ञानिक प्रगतीमुळे माणूस आज अवकाशातून विहार करतो आहे प्रगतीचे नवे नवे शिखर पादाक्रांत करीत आहे. पण सामाजिक सांस्कृतिक आणि मानसिक दृष्ट्या तो उद्ध्वस्त झाला आहे राक्षसी प्रवृत्तीची माणसं आज मानव तिला नष्ट करायला निघाले आहेत ही चिंता कवी **'चिंता'** या कवितेतून व्यक्त करतात.

'विज्ञानाची रेल धावते | संस्कृतीची वेल थरकते  
खेडूत म्हणतो येताळाचे | असेच जुळते हडळी नाते'(ऊनपाऊस पृष्ठ क्र. ३०)

वैज्ञानिक प्रगती आणि सांस्कृतिक अधोगती यांचा संबंध या कवितेतून व्यक्त झाला आहे. वैज्ञानिक प्रगती ज्या वेगाने होत आहे त्या वेगामुळे मातीचा आधार घेऊन वाढणारी संस्कृतीची नाजुक वेल मात्र थरथरते आहे त्यामुळे विज्ञान व संस्कृतीमध्ये संघर्ष होतो आहे. हा संघर्ष कवी 'येताळाचे असेच जुळते हडळी नाते' या उपमेतून व्यक्त करतात. विज्ञानामुळे



CamScanner

CamScanner

झालेल्या प्रगतीचे तसेच त्याच्या भल्याबुऱ्या वापराचे चित्रण काही कवितातून दिसून येते. 'चिंता' या कवितेत कवींने विज्ञानाच्या घोडदौडीवर मार्मिक भाष्य केले आहे.

'दहशतवादी रावण गर्जे
खोदुनि खाईल कंदमुळांना' ( ऊनपाऊस पृष्ठ क्र. १० ).

या शेवटच्या काव्यपंक्तीतून कवीला संस्कृतीविषयी आपल्या भविष्याविषयी वाटणारी चिंता कवी व्यक्त करतो आहे. विज्ञानरुपी या राक्षसाला 'दहशतवादी रावण' ही पौराणिक वाङ्‌मयाची संकल्पना योजून कवी विज्ञानाचे संहारकत्व अधोरेखित करतो आहे. हा राक्षस केवळ मार्गात येईल त्या गोष्टींना नष्ट करणार नाही तर आपली पाळेमुळे खोदून आपल्यातील 'माणूसपण' ही नष्ट करील ही चिंता कवीला सतावते आहे. विज्ञानाच्या प्रसारामुळे वापरामुळे मानवी जीवन समृद्ध झाले पण ते सुखी झाले का? विज्ञान आणि मानवी समाज यांच्या संबंधावर नेमके भाष्य कवी करतात.

'ऊनपाऊस' या काव्यसंग्रहातील **'विज्ञानयुग'** या दीर्घ कवितेत विज्ञानाने पादाक्रांत केलेल्या जगाचा वेध कवी घेतात. विज्ञान संशोधन, विश्वनिर्मितीचा सिद्धांत, मानवाने प्रयोगशाळेत लावलेले विविध शोध संगणक क्रांती, मोबाईलचे सर्वव्यापकत्व, अत्याधुनिक पाणबुड्या, जगबुडीचे भाकीत, कृष्णविवर इत्यादी घटना, घडामोडी व वैज्ञानिक प्रगतीचा कवी वैज्ञानिक दृष्टिकोनातून वेध घेतात. वैज्ञानिक संशोधनाची समृद्धी आज जगात सर्वत्र दिसते आहे. विज्ञानाच्या समृद्धीने आनंदलेल्या जगाला उद्देशून कवी म्हणतो

'पेढे घ्या पेढे द्या | आता जुने पाढे गेले
भले! विज्ञान पुढे गेले | नवे नवे धडे आले'

विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनामुळे आणि विज्ञानवादी परंपरेमुळे मानवी जीवन शैली बदलली.औद्योगिक क्रांती झाली. गर्दीची शहरे निर्माण झाली. भौतिक समृद्धी साधन या संदर्भातील अनेक सुखसोयीची साधने त्यांनी निर्माण केली. त्यामुळे माणूस एका अफाट वेगात सापडला आहे. एकीकडे जशी त्याने भौतिक समृद्धी साधली तसा तो स्वाभाविक आणि नैसर्गिक जीवनाला पारखा होत गेला. या सर्व घटकांचा नेमका वेध प्रा.आ. य.पवार प्रस्तुत कवितेत घेतात.

पिटर हिंज या शास्त्रज्ञाने देवकणाचा सिद्धांत मांडून विश्वनिर्मितीविषयी असलेल्या आजपर्यंतच्या सर्व तर्कांना, व सर्व वदंतांना, धर्मकल्पनांना धक्का दिला. आणि ब्रह्मांडाचे नवीन ज्ञान जगाला उपलब्ध करून दिले. पंचमहाभूतांनी व्याप्त ही पृथ्वी अणू-रेणू व परमाणूंची बनलेली आहे. आयुष्यभर संशोधन चिंतन मनन करून परमाणुचे रहस्य शोधणाऱ्या भारतीय वैज्ञानिक कणाद ऋषींचा कवीला अभिमान आहे.

मायन संस्कृतीच्या कालगणनेप्रमाणे जगबुडी चे २०१२ चे भाकित वर्तवले जाते. या भाकितामळे मानवी मनात भविष्यविषयक अस्थिरता निर्माण होऊन त्याचा कल आहे ते उपभोगण्याकडे, मौजेकडे वळतो हे कवी- 'खाऊन पिऊन मौज करा /उद्या कांहीं खरं नाही' अशा मोजक्या शब्दातून व्यक्त करतात

जगबुडीच्या या भाकितावरोबरच अवकाशातील वेगवान तारा पृथ्वीला धडक देईल आणि कृष्णविवर क्षणार्धात जगाला ओढून घेईल असे भाकितही वर्तवले जाते. परंतु अशा भाकड वल्गनांना, कथांना या विज्ञान युगात मात्र वाव नाही, थारा नाही,असे कवी ठणकावून सांगतो आहे

वैज्ञानिक सिद्धांताच्या आविष्कारातून समाजामध्ये असलेल्या ज्योतीष, जगबुडी अशा घट्टपणे रुतून बसलेल्या अवैज्ञानिक समजुतींना एक प्रकारे उखडून टाकण्याचे काम **'विज्ञानयुग'** ही कविता करते.

विज्ञान साहित्य प्रसारातून समाजातील अंधश्रद्धावर खूळचट रूढीवर घणाघाती हल्ला करता येतो हा विज्ञान साहित्याचा हेतू प्रा.आ.य. पवारांच्या कवितेतून सफल होताना दिसतो आहे.

वैज्ञानिक प्रगतीतून उभ्या राहिलेल्या नैतिक आणि सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी प्रा.आ.य. पवार यांची **'रूपांतर'** ही कविता लिंगबदलासारख्या स्फोटक विषयावर विदारक भाष्य करून वर्तमानाबरोबरच भविष्याचा वेध घेते. एका पुरुषाचे स्त्रीमध्ये किंवा स्त्रीचे पुरुषांमध्ये होणारे रूपांतर समाजाच्या अवहेलनेचा आणि चेष्टेचा विषय ठरतो. अशा घटनांचे प्रमाण अल्प असले तरी संबंधित व्यक्तीला येणारे विलक्षण अनुभव व त्यातून निर्माण होणारे शारीरिक मानसिक ताण- तणाव हे दाहकच असतात. या वैशिष्ट्यपूर्ण विषयावर बेतलेली ही कविता एका संवेदनशील विषयाकडे लक्ष वेधून घेते.



CS CamScanner
CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67

वर्तमान आणि भविष्यकाळ याचे संदर्भ असलेली **'अनोखी खरेदी'** ही कविता विज्ञाना बरोबर जगण्याचा वेध घेते पोर्टल, ऑनलाइन शॉपिंग, स्वीस बँक, विश्व बँक, चलनबंदी, कॅशलेस व्यवहार, इन्कम टॅक्स तसेच मंगळावर जमीन खरेदी विक्री केल्याचे वर्तमान वास्तव इत्यादी संदर्भांनी ही कविता वर्तमान वास्तव उजागर करते. पण विज्ञान साहित्य वर्तमानाबरोबर भविष्याचा वेध घेते. भविष्याचा वेध घेताना कवी माणसाच्या हावरट वृत्तीवर ही भाष्य करतात.
विज्ञानामुळे बदलू घातलेल्या मानवी जीवनाची व वर्तणुकीचे चित्रण करताना कवी चंद्र-मंगळापासून तर अगदी सूर्या पर्यंतची जमीन खरेदी पद्धत त्यातील प्रकाश पाऊस 'ड' जीवनसत्व चतु:सीमा आणि अक्षांश रेखांशाच्या खरेदीखतातील नोंदी इत्यादीची अनोखी पद्धत सांगतात.

विज्ञान कथा-कविता या नुसत्या कल्पनेच्या भरारीतून साकारलेल्या चमत्कृती नसतात तर त्यामध्ये भविष्यात प्रत्यक्षात उतरू शकणाऱ्या कल्पनांचा आविष्कार असतो. त्यामुळे आज अनोखी वाटणारी ही खरेदी विक्री पद्धत अस्तित्वात यायला फार वेळ लागणार नाही. कारण आजच अनेक कंपन्या मंगळावर जमीन खरेदीचा दावा करीत आहेत. नासाने ही २०३० पर्यंत मंगळावर वस्तीचे ध्येय ठेवले आहे. त्यामुळे **'अनोखी खरेदी'**मध्ये आलेले संभाव्य कल्पित भविष्यात वास्तवात येऊ शकेल असा कवीला विश्वास वाटतो.

एकंदरीत विज्ञानाचा खगोलाचा थेट संबंध मानवी जीवनाशी असल्यामुळे त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामाचा विचार प्राध्यापक आय पवार विज्ञान कवितेत करतात खरेतर त्यांच्या विज्ञान कविता ह्या विज्ञान खोल विषयावर आधारलेल्या असल्या तरी त्या अनुषंगाने पवार यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू हा मानवच आहे वास्तव आणि संभाव्य वैज्ञानिक सत्य यात कुठेही आडपडदा न ठेवता ते आपला विचार निर्भीडपणे मांडतात वैज्ञानिक प्रगतीच्या आणि विविध शोधांच्या त्यात उद्या मानवी जीवनाचे अस्तित्व अबाधित राहील काय त्याचे मानवी जीवनावर काय परिणाम होतील या सर्व विषयांची वेगवेगळ्या दृष्टिकोनातून कवीने चिंतन केले आहे या साठी वापरलेल्या प्रतिमा प्रतीके यातून नेमका आशय व्यक्त होतो विज्ञान किंवा खगोल आवर लिहीत असताना त्याची एक स्वतंत्र परिभाषा असते त्याचे ज्ञान सर्जनशील कलावंत असतेच पण ती परिभाषा सर्वसामान्य वाचकालाही समजली पाहिजे विज्ञानाच्या परिभाषेत व्यवहाराच्या भाषेत द्वारा खगोल विषयी काही एक विचार वाचकाला पटवून देण्यामध्ये आई पवार यशस्वी झालेले आहेत असे मला वाटते नव्वदोत्तरी मराठी साहित्यात ग्रामीण जीवनावर कथा-कविता लेखन करणारे प्रा. आय.य.पवार हे प्रतिभासंपन्न कवी आहेत कथेपेक्षा कवितेत त्यांना विशेष रुची आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) मराठी साहित्य विमर्श आणि विमर्शक- डॉ. व. दि. कुलकर्णी पद्मगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे
२) व्दिदल- आ. य. पवारांची निसर्ग व विज्ञान कविता यशोदीप पब्लिकेशन पुणे
३) धूळपेर – आ. य. पवार, रानजाई प्रकाशन पुणे
४) इंद्रधनू – आ. य. पवार यांच्या 'ऊनपाऊस' कवितेचे विविध रंगी स्वरूप-संपादक:प्रा.डॉ. मधुकर क्षीरसागर व प्रा. विजया राऊत, रानजाई प्रकाशन पुणे



CS CamScanner